# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

MIDC - DJMS
E&MB/ 2860
Date: 3/3/10

'उद्योग सारथी'
महाकाली गुंफा मार्ग,
अंधेरी (पूर्व),
मुंबई ४०० ०९३.

क्र. मऔविम/विधी व कामकाज विभाग / १०४ दिनांक :- 3 MAR 2010

## प रि प त्र क

**विषय :- सबलिजसाठी परवानगी देणेबाबत.**

महामंडळाने विकसित केलेल्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंड वाटप, भूखंड हस्तांतरण, पोटभाडयाने बांधीव जागा देणेबाबतचे धोरण महामंडळाने निश्चित केलेले आहे. परंतू सबलिज देण्याबाबतचे महामंडळाचे कोणतेही धोरण नसल्याने उद्योजकांकडून क्षेत्र दिर्घकालीन मुदतीसाठी सबलिज करण्याबाबत प्रस्ताव प्राप्त होत असतात. त्या अनुषंगाने बाब संचालक मंडळाच्या दिनांक २९/१२/२००९ रोजी झालेल्या ३३३ व्या सभेत सादर करण्यात आली होती. सदर बाबीवर सविस्तर चर्चा होऊन ठराव क्र. ४८७३ पारीत करण्यात आला. त्या अनुषंगाने सबलिजसाठी परवानगी देणे संबंधीची मार्गदर्शक तत्वे खालील प्रमाणे निर्गमित करण्यात येत आहेत. :-

१) ज्या भूखंडांना सबलीजसाठी परवानगी दिली जाईल त्या भूखंडाचे लिज झालेले असावे किंवा प्रथम ते करण्यात येऊन सबलीजला परवानगी देण्यात यावी.

२) सबलीज करताना भूखंडाचा जेवढा भाग सबलीज करण्यात येईल तेवढया क्षेत्रापुरती महामंडळाच्या हस्तांतरण मार्गदर्शक तत्वानुसार अनुज्ञेय फरकाची रक्कम वसूल करण्यात यावी.

३) सबलीजचा करारनामा नोंदणीकृत करणे व त्यासाठीची स्टॅंप डयुटी भरण्याची जबाबदारी Lessee / Sub-lessee ची राहील.

४) लीजच्या सर्व शर्ती व अटी हया सबलेजीला लागू राहतील.

५) लीज जर काही कारणास्तव रद्द झाले (Terminate) तर सबलिज देखील आपोआप रद्द होईल.

६) सबलिज हे लीजच्या उर्वरीत कालावधीसाठी किंवा उद्योजकाने विनंती केलेल्या (उर्वरीत राहिलेल्या कमी असलेल्या कालावधीसाठी) कालावधीसाठी करण्यात यावे.

७) सबलिज करण्याचा करारनामा हा मुळ Lessee महामंडळ व Sub Lessee असा त्रिपक्षीय राहून तो नोदणीकृत करणे बंधनकारक राहिल.

८) सबलीजची परवानगी देताना ते नियोजनदृष्टया योग्य आहे किंवा कसे याबाबतची पडताळणी करण्यात यावी.

(कृ.मा.प.)

९) सबलेसीला स्वतंत्रपणे नळजोडणी, मलनि:सारण जोडणी इ. पुरविण्यात येणा-या सुविधांपोटी अदा करावयाची अनुज्ञेय रक्कम महामंडळास भरण्याची जबाबदारी सबलेसीची असेल.

१०) जर सबलेसीला कर्ज उभारावयाचे असेल तर ते त्यांना सबलीज करण्यात आलेले क्षेत्र व कालाबधी यासाठी मर्यादित असेल. याकरिता महामंडळाची लेखी पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील व करारनामा करताना महामंडळ, Lessee, Sub-lessee व वित्तीय संस्था यांच्यात बहूपक्षीय करारनामा करण्यात येईल.

११) सबलेसिला पुन:श्च सबलिज करणे अथवा पुढे दुस-या व्यक्तीस अथवा संस्थेस पोटभाडयाने देणे अनुज्ञेय राहणार नाही.

सदरचे मार्गदर्शक तत्वे या परिपत्रकाचे दिनांकापासून लागू राहतील, सर्व संबंधीतांनी सदर मार्गदर्शक तत्वाची नोद घेऊन त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

(डॉ. के. शिवाजी)
मुख्य कार्यकारी अधिकारी
मऔविम, मुंबई

प्रति,

१. सह मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, मुंबई
२. सह मुख्य कार्यकारी अधिकारी, (मा व तं) मऔविम, मुंबई.
३. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
४. सर्व कार्यालयीन प्रमुख, मऔविम.
५. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम
६. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,
७. भू विभाग कार्यासन-१,२.३.४ मऔविम
८. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती.